व्यक्तिमत्त्व ऊर्जा आणि उत्साहानं समृद्ध आहे. भारतातील आघाडीच्या हुशार दांपत्यांची एखाद्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करायची असेल तेव्हा प्रमोद आणि परिमल यांचं नाव त्यात अग्रभागी असावं, असं मला वाटतं. व्यावसायिक विकास हा आनंदी कौटुंबिक जीवनाशीही निगडित असतो. केवळ भांडवली बाजारातील मूल्यावरून प्राज उद्योगसमूहाचं खरं मूल्य समजणार नाही तर ज्यांना २१ व्या शतकातील नवभारताच्या उभारणीत सहभागी व्हायचं आहे अशा लक्षावधी तरुणांच्या मनातील प्रेरणांच्या मूल्यांवरच ते ठरवता येईल.''

डॉ. माशेलकरांनी 'प्राज'च्या सुरुवातीच्या काळापासून जी प्रेरणा दिली, तंत्रज्ञान, इनोव्हेशन यासह विकासाच्या मार्गावर जगभरात जाण्यासाठी जी दिशा दिली, मार्गदर्शन केलं त्याबद्दलची कृतज्ञता डॉ. प्रमोद चौधरी नेहमीच व्यक्त करत असतात. 'प्राज'च्या विविध उपक्रमांच्या निमित्तानं, तसंच मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रिकल्चर या पुण्यातील उद्योजकांच्या संघटनेचं अध्यक्षपद भूषवताना प्रमोद यांचे डॉ. माशेलकरांशी जे ऋणानुबंध जुळले ते कायमचेच. त्याबद्दलचा आनंद आणि समाधान प्रमोद यांच्या बोलण्यातून नेहमीच व्यक्त होत असतं.

---



**रवी पंडित : मराठी उद्योजकांचा प्रवास - सरस्वतीकडून लक्ष्मीकडं**

समृद्ध महाराष्ट्राच्या आजवरच्या वाटचालीत इथल्या उद्योजकांचं मोठं योगदान आहे. लक्ष्मणराव किर्लोस्कर, शंतनुराव किर्लोस्कर आणि या उद्योगसमूहातील आजपर्यंतच्या पिढ्या, आबासाहेब गरवारे, नीळकंठ आणि बाबा कल्याणी, चितळे बंधू आणि अशी अनेक नावं घेता येतील. केव्हा ना केव्हातरी डॉ. माशेलकरांचा यातल्या बहुतेकांशी परिचय झालेला आहे.

१९९८ मध्ये झालेल्या जागतिक मराठी परिषदेचं अध्यक्षस्थान डॉ. माशेलकरांनी भूषवलं होतं. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचं शीर्षक होतं.

'ज्ञानाधिष्ठित समाजाकडे!' त्यात त्यांनी म्हटलं होतं, ''औद्योगिकीकरणाच्या क्षेत्रातही महाराष्ट्र आजवर आघाडीवर राहिलेला आहे. यात मराठी समाजाचा सहभाग हे उद्योग व्यवस्थित चालवण्यापुरताच मर्यादित राहिलेला आहे. नवनवे उद्योग स्थापन करण्यात आजवर मराठी समाज तसा थोडासा पाठीच राहिला. आजवरचे उद्योगधंदे हे भांडवलावर आधारित असल्यामुळे मराठी समाजाला त्यात आघाडी घेता आलेली नसावी. परंतु उद्याच्या उद्योगांची मदारही, मग ते माहिती तंत्रज्ञानावर आधारित असोत, जैव तंत्रज्ञानावर आधारित असोत, ज्ञानावर आणि त्यात आगळीवेगळी नित्यनूतन भर घालण्याच्या क्षमतेवर अवलंबून असणार आहेत. त्यामुळं मराठी समाजाला उद्योगधंद्यांची स्थापना करण्याची फार मोठी संधी उपलब्ध होणार आहे. आपल्याकडं टाटा, बिर्ला, अंबानी असे उद्योजक झाले नाहीत म्हणून आपण खंत करतो. पण ज्ञानाधिष्ठित उद्योग स्थापन करणारा 'मराठी बिल गेटस्' का होऊ शकणार नाही? त्यासाठी नवीन संधीचा फायदा घेण्याची आणि ते आव्हान पेलण्याची तयारी मात्र आतापासूनच करायला हवी. तशा प्रकारचं एक अभियानच चालवलं गेलं पाहिजे. जागतिक मराठी परिषद या संबंधात काही ठोस कार्यक्रम राबवू शकेल. अशा प्रकारचं संस्थात्मक पाठबळ मिळाल्यास या चळवळीला निश्चितच वेग येईल.''

ज्ञानशक्तीच्या साहाय्यानं संपत्ती निर्माण करता येते, म्हणजेच 'सरस्वतीकडून लक्ष्मीकडं' जाणारा हा मार्ग आहे आणि महाराष्ट्रातील उद्योजकांनी हे समर्थपणे करून दाखवलं आहे. अगदी अलिकडच्या काळातली दोन उद्योजकांची उदाहरणं घेऊन हे अधिक स्पष्ट करता येईल असं सांगून डॉ. माशेलकर म्हणतात, ''रवी पंडित यांनी माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणि प्रमोद चौधरी यांनी जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उद्योजक म्हणून जी भरारी घेतली आहे, हा प्रवास नवउद्योजकांसाठी अत्यंत प्रेरणादायी असाच आहे.''

### रवी यांचं नेतृत्व

शैक्षणिक आणि व्यावसायिकदृष्ट्या चार्टर्ड अकौंटंट असलेले रवी पंडित हे माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सल्ल-सेवा देण्यासाठी १९९० मध्ये स्थापन झालेल्या के.पी.आय.टी. या कंपनीचे सहसंस्थापक आहेत. त्यांच्याच निमंत्रणावरून डॉ. माशेलकर या कंपनीचे संचालक झाले. चेअरमन आणि कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रवी पंडित यांनी या कंपनीला जे नेतृत्व दिलं, त्याचा प्रभाव डॉ. माशेलकरांवर पडला. वाहन उद्योग, वाहतूक क्षेत्र, उत्पादन क्षेत्र आणि सेवा उद्योगामध्ये या कंपनीनं घेतलेली आघाडी आश्चर्यकारक आहे.

डॉ. माशेलकर संचालक झाल्यावर कंपनीच्या व्यवस्थापनातली वरिष्ठ मंडळी कंपनीची पुढील प्रगती आणि त्यासंबंधीच्या डॉ. माशेलकरांच्या कल्पना

याबाबत त्यांच्याशी चर्चा करू लागली. डॉ. माशेलकर सांगतात की, मनुष्यबळाच्या किंमतीवरच कंपनीची कार्यप्रणाली तोवर आधारलेली होती. ही प्रणाली कल्पनाशक्तीच्या मूल्यावर केव्हा नेता येईल, ज्यायोगे नवी ज्ञाननिर्मिती, बौद्धिक संपदा आणि त्यायोगे पेटंटस् घेण्याच्या दृष्टीनं प्रवास सुरू होईल. या मुद्द्यांवर ती चर्चा सुरू होती. कारण तोपर्यंत कंपनीकडं एकही पेटंट नव्हतं.

**केपीआयटी इनोव्हेशन कौन्सिल**

या पार्श्वभूमीवर रवी पंडित यांनी दूरदृष्टीनं पुढील आराखडा तयार केला. डॉ. माशेलकरांच्याच अध्यक्षतेखाली त्यांनी नवनिर्मितीसाठी 'केपीआयटी इनोव्हेशन कौन्सिल'ची स्थापना केली आणि जागतिक ख्यातीचे तज्ज्ञ त्यावर घेतले. आज डॉ. माशेलकर संचालक नसले तरी या इनोव्हेशन कौन्सिलचं कार्य उत्तम चालू आहे.

नवनिर्मितीचा विचार करून या कंपनीनं पहिल्यांदा जेव्हा राष्ट्रीय संशोधन प्रयोगशाळांशी भागीदारी केली तेव्हा उत्पादन आणि संशोधनाची विषयपत्रिका इनोव्हेशनच्या दिशेनं गतिमान झाल्याचं डॉ. माशेलकरांनी पाहिलं. इ.स. २००२ मध्ये सी.एस.आय.आर.चे महासंचालक असताना त्यांनी 'न्यू मिलेनियम इंडियन टेक्नॉलॉजी लिडरशिप इनिशिएटिव्ह'ची सुरुवात केली होती. रवी त्यात सहभागी झाले होते. आज ज्याबद्दल अधिक चर्चा होऊ लागली आहे त्या हायड्रोजन फ्यूएल सेल्सबाबत वीस वर्षापूर्वी एक उपक्रम हाती घेण्यात आला होता, अशी डॉ. माशेलकरांची आठवण आहे. तर या अनुषंगानं रवी पंडित यांनी १६ डिसेंबर २०२१ च्या भारतातील पहिल्या हायड्रोजन फ्यूएल सेल्सवर आधारित बसचा शुभारंभ करण्याचा मान डॉ. माशेलकरांना दिला. एन.सी.एल. आणि सी.एस.आय.आर.च्या अन्य प्रयोगशाळांच्या मदतीनं बनवण्यात आलेली आणि हायड्रोजन इंधनावर चालणारी ही संपूर्ण भारतीय बनावटीची बस म्हणजे आत्मविश्वास असलेल्या आत्मनिर्भर भारताचं' जणू प्रतीकच आहे, असं डॉ. माशेलकरांना वाटतं.

रवी यांनी ओळखलं की, आपला देश लिथियम आयन बॅटरीजवर अवलंबून आहे आणि त्याच्या वितरणाचं नियंत्रण चीनकडं आहे. हे लक्षात घेऊन सोडियम आयन बॅटरीज विकसित करण्याचा पर्याय स्वीकारून त्यांनी त्यात यश मिळवलं. इतकंच नाही तर भारतात तयार होणाऱ्या ४५० लाख टन शेती कचऱ्याचा कसा उपयोग करून घ्यायचा? याचा विचार करून त्यापासून हायड्रोजन तयार करण्याचा, त्याचा इंधन म्हणून वापर करण्याचा रवी यांचा प्रयत्न यशस्वी ठरल्यानं आता शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढण्याबरोबरच नवे रोजगार तयार होऊ शकतील, असा विश्वास डॉ. माशेलकरांना वाटतो.

**विज्ञानाशी बांधिलकी**

पुणे इंटरनॅशनल सेंटर, शहरी समस्या (विशेषतः कचऱ्याचा प्रश्न) मार्गी लावण्यासाठी पुण्यात स्थापन झालेल्या जनवाणी या स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक-विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या रवी पंडित यांनी ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या 'छोटे वैज्ञानिक' उपक्रमातही डॉ. माशेलकरांचं मार्गदर्शन घेतलं आहे. आपल्या के.पी.आय.टी. च्या या उपक्रमांचा त्यांनी भारतातील अनेक राज्यांमधील ८० हजार विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला आहे. त्यांनी याच कंपनीमार्फत वाहतूक आणि ऊर्जेच्या क्षेत्रातील नवकल्पनांसाठी देशातील एक मोठी स्पर्धा घेण्यास सुरुवात केली. २३ राज्यांमधील एक हजारांपेक्षा अधिक महाविद्यालयांमधील पदवीपूर्व आणि पदवी प्राप्त केलेले सुमारे वीस हजार विद्यार्थी या स्पर्धेत दरवर्षी सहभागी होतात. त्यातील पुरस्कारप्राप्त नवकल्पनांना आकर्षक पारितोषिकं दिली जातातच, पण त्या नवकल्पना व्यावसायिक स्वरूपात तयार होऊन समाजाला त्यांचा उपयोग होण्याच्या दृष्टीनं देखील ही कंपनी संबंधितांना साहाय्य करते. त्यातूनच विज्ञानावर आधारित स्टार्ट अप्स्‌ना आता चालना मिळणार आहे. याशिवाय ऊर्जेची नवीन क्षेत्रं आणि वाहतुकीबाबतच्या विषयांमध्ये संशोधन करून पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या संशोधकांनाही या कंपनीतर्फे गौरवण्यात येतं. रवी यांनी सातत्यानं अशा उपक्रमांना सर्वार्थानं भरघोस पाठिंबा दिल्याबद्दल डॉ. माशेलकरांना त्यांचं खूप कौतुक वाटतं.

रवी यांच्याशी असलेली मैत्री आणि नवकल्पनांबाबतची त्यांची तळमळ यातूनच डॉ. माशेलकर आणि रवी पंडित यांनी २०१९ मध्ये 'बेडुक उडी ते हनुमान उडी' (Leap Frogging to Pole Vaulting) या शीर्षकाच्या ग्रंथाची निर्मिती केली. पेंग्विन प्रकाशनानं तो प्रकाशित केला आहे.